
श्रीनारायणास अर्पित

# यशोधर्मन

कृत

# जर सत्याचे ज्ञान तुम्हांस असते - 1

## तर कदाचित तुमचे विचारच बदलून गेले असते



## [28]

### उठा अर्जुना ! माझ्या हिंदू राष्ट्रा, जागा हो

माझ्यासमोर सर्वात मोठे आव्हान असेल - वाचकांच्या मनावर व मेंदूवर ज्या चूक धारणा शिक्षण आणि प्रसार-माध्यमां-द्वारे लादल्या गेल्या आहेत, त्या पुसून टाकणे. हे मुळीच सोपे नसेल. या धारणा एवढ्या खोलवर रूजलेल्या आहेत की त्या सहजासहजी पुसल्या जाणार नाहीत. एकवेळ माझे पुस्तक वाचून लोक हे मानतील की ते खरे नव्हे जे आतापर्यंत त्यांनी जाणले व शिकले. यायोगे विशेष काही होणार नाही. कारण एकवेळा वाचण्याने त्यांचा चेतन मेंदू तर याचा स्वीकार करील, पण अचेतन मेंदूवर याची छाप खोलवर असणार नाही. जेव्हा म्हणून अशी संधी येईल की ते आपणहून काही विचार करतील अथवा विश्लेषण करतील तेव्हा त्यांच्या अचेतन मेंदूतून अशाच धारणा त्यांच्या बोलीतून आणि लेखणीद्वारे प्रकट होतील ज्यांची छाप त्यांच्या मेंदूवर एवढी खोल पडलेली असेल की ती मिटता मिटणार नाही.

# प्रस्तावना

ॐ नमो नारायणाय!

माझ्यासमोर सर्वात मोठे आव्हान असेल - वाचकांच्या मनावर व मेंदूवर ज्या चूक धारणा शिक्षण आणि प्रसार-माध्यमां-द्वारे लादल्या गेल्या आहेत, त्या पुसून टाकणे. हे मुळीच सोपे नसेल. या धारणा एवढ्या खोलवर रूजलेल्या आहेत की त्या सहजासहजी पुसल्या जाणार नाहीत.

*एकवेळ माझे पुस्तक वाचून लोक हे मानतील की ते खरे नव्हे जे आतापर्यंत त्यांनी जाणले व शिकले. यायोगे विशेष काही होणार नाही. कारण एकवेळा वाचण्याने त्यांचा चेतन मेंदू तर याचा स्वीकार करील, पण अचेतन मेंदूवर याची छाप खोलवर असणार नाही.*

जेव्हा म्हणून अशी संधी येईल की ते आपणहून काही विचार करतील अथवा विश्लेषण करतील तेव्हा त्यांच्या अचेतन मेंदूतून अशाच धारणा त्यांच्या बोलीतून आणि लेखणीद्वारे प्रकट होतील ज्यांची छाप त्यांच्या मेंदूवर एवढी खोल पडलेली असेल की ती मिटता मिटणार नाही.

आपण हे समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे की असे का होते? कारण जो पर्यंत आम्ही समस्येच्या मुळाशी पोहोचणार नाहीत तो पर्यंत तिचे निर्मूलन करू शकणार नाहीत.

ही सहावी पिढी आहे. ईसाई-इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव आमच्या मनांवर-मेंदूवर फार खोलवर छाप टाकून आहे. जे आम्ही बालपणी शिकलो, तसेच तारुण्यात जाणले आणि वार्धक्यापर्यंत त्याची वास्तविकता ओळखली नाही, ते कसे खोटे वाटेल आम्हाला?

*यामुळेच प्रत्येक नवीन परिदृष्टी आमच्याठायी उत्सुकता तर जागविते, पण आमची विचारसरणी पूर्णतया बदलणार नाही. वेळोवेळी आम्ही पुन्हा तोच राग आळवू लागतो जो आमच्या अस्तित्वाचे अंग बनून राहिला आहे. एवढा गाढ असतो प्रभाव (1) शिक्षणाचा तसेच (2) एकाच विचारप्रणालीचा वारंवार अंगिकार करीत राहाण्याचा.*

*मग या प्रपंचातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता? तोच, ज्याचा प्रयोग केला गेला होता आम्हांवर त्या चक्रव्यूहात फसविण्यासाठी -*

*(1) ईसाई-इंग्रजी शिक्षणाचे निर्मूलन*

*(2) नवीन माहिती वारंवार घेत राहणे, ज्यायोगे आमच्या अचेतन मेंदूतील जुनी माहिती अगोदर मिटवून त्यानंतर नवीन माहिती तिच्या जागी प्रस्थापित करणे.*

डोळे झाकून तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवावा असे मी इच्छित नाही. जे काही माझ्याकडून शिकाल, जाणाल, ते स्वत: पारखून पाहा. पण एवढी मात्र आशा मी अवश्य बाळगतो की खरे आणि खोटे यांची तोंडओळख तुम्हांठायी असावी. जसा माझ्यावर डोळे झाकून विश्वास तुम्हीं न ठेवावा, तसाच तुम्ही इतरांवरही डोळे झाकून विश्वास ठेवू नये, मग तो कोणीही का असेना - तुमचा शिक्षक, मार्गदर्शक अथवा धर्मगुरू.

*अशी शक्यता असू शकते की ते स्वत: अज्ञानचे शिकार असू शकतात आणि ते अज्ञानच तुम्हांपर्यंत सत्यसमजून पोहोचवीत आले असावेत, कारण त्यांच्या शिक्षणाचा स्रोत ही तसाच होता, जो तुमचा आहे.*

आपल्या संस्कृतीत जे काही आहे ते अद्वितीय आहे, कारण त्यात निहित आहे सनातन सत्य, असे सत्य जे कालचे सत्य. असे सत्य जे आजही सत्य, पण आम्ही गमावून बसलो आहोत त्याची ओळख[1]. असे सत्य, जे असेल उद्याही सत्य.

*अशा सनातन सत्याचा एक संकेतात्मक प्रयोग पाहा - हिन्दू विवाह होतो सात फेरे मारल्यावर. ईसाई-इंग्रजी शिक्षणपद्धतिचा आरंभ झाला 1835 ईसवीमध्ये. तीस वर्षांत एक नवी पिढी तयार होते. 1835 ते 2005 वर्षांत 170 वर्षे होतात. 180 होण्यास आणखी 10 वर्षे लागतील. 180 वर्षांचा अर्थ होतो 6 पिढ्या, ज्याच्या शेवटच्या टप्प्याकडे आम्ही वेगाने पोहोचत आहोत. त्यानंतर आणखी एक पिढी जाण्याचा उशीर, की होणार सात पिढ्या पूर्ण. ईसाई शिक्षणपद्धतीची सातवी पिढी. तेव्हा आपण केवळ नामधारी हिंदू असू, पण आपली विचारशैली असेल ईसाई, चरित्रही आपले असेल ईसाई.*

यशोधर्मन

[1] पण चुकून्सुद्धा दोष न द्यावा स्वत:स (हिंदूना) कारण तुम्ही शिकार झाला आहात एका फार मोठ्या षड्यंत्राची, एका सुनियोजित पद्धतीने. या षड्यंत्राची कहाणी आम्ही आपणांस तेव्हा सांगू जेव्हा पुस्तक-7च्या हिंदी/मराठी अनुवादाचा प्रारंभ करू. हे पुस्तक 248 पृष्ठांचे आहे म्हणून त्यास काही वेळ तर लागेलच त्याचे हिंदी/मराठी रूपांतर प्रस्तुत करण्यास.

# ईसाई धर्मातील प्रथम वैशिष्ट्य - मायावी प्रकृती

*मायावी अशास म्हणावे ज्याची खरी ओळख लपलेली - दडलेली असते. हळूहळू त्याची खरी ओलख तुम्हांस करून देईन मी.*

> जोजेफ मॅकॉबे आपले पुस्तक द टेस्टामेंट ऑफ क्रिश्चियन सिव्हिलीजेशन (अर्थात ईसाई सभ्यतेचे विधान) मध्ये लिहितात की ईसाई धर्माची स्थापना झाली ती रक्ताच्या नद्या वाहून. ईसाई धर्माचे प्रथम सर्वोच्च धर्मगुरू प्रथम पोप यांनी आपल्या पुत्राचा वध केला, आपल्या पत्नीचा खून केला, आपल्या भाच्यास मारून टाकले आणि आपल्या अनेक मित्रांचा खून केला. या घोर अपराधांविषयी यूट्रोपियसने लिहिले, तसेच चौथ्या शताब्दीचे ईसाई संत जेरोमेने याची पुष्टी केली. या घटनांच्या खरेपणाविषया सांप्रत कसला विवाद नाही. हे आज मान्यताप्राप्त सत्य आहे.

ISBN 81-85990-21-2, p 45 notes

> जगप्रसिद्ध ऑक्सफोर्ड इंग्रजी शब्दकोशानुसार (1) संत जेरोमे जाणले जातात वल्गेटच्या संकलनकर्त्याच्या रूपात (2) वल्गेट लॅटीन भाषेत लिहिले गेलेले बायबलचे मुख्य स्वरूप आहे, ज्यास रोमन कॅथोलिक चर्चद्वारे अधिकृत विषयवाक्याची मान्यता प्राप्त आहे (अर्थात संत जेरोमेने लिपिबद्ध केलेले सत्य वॅटिकनद्वारे प्रमाण मानले जातात (3) रोमन कॅथोलिक चर्चमध्ये पोपला पोंटिफेक्स मॅक्सिमस म्हटले जाते, जी त्यांच्या सर्वोच्च धर्मगुरूची उपाधी आहे (4) पोपचे स्थान वॅटिकन (राज्यात) मध्ये आहे.

ISBN 019-565432-3, pp 980, 2073, 1440

*तेव्हा तुम्ही ईसाई धर्माच्या प्रथम सर्वोच्च धर्मगुरुचे चरित्र कसे होते ते पाहिले. आता विचार करा की त्यांच्या अनुयायांचे चरित्र कसे असेल? स्वाभाविक आहे की त्यांचे अनुयायी आपल्या धर्मगुरुचेच अनुसरण करतील. कोण असतो अनुयायी? तोच जो आपल्या गुरुस आदर्श मनतो आणि स्वत:स त्यांनी दाखविलेल्या मार्गानुरूप घडविण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.*

तुमच्या मनास कधी प्रश्न पडतो का की प्रथम पोपच्या अशा खुनी चरित्रास कोणी रूप दिले? सत्य जाणाल, तर दंग होऊन जाल. तुमचा तुमच्या डोळयांवर विश्वास बसणार नाही. *म्हणून मी आपणांस विनंती करीत आहे की बायबलची एक प्रत ध्या आणि स्वत: वाचून पाहा की ईसा मसीहाने वास्तविक काय म्हटले होते आणि ईसायांच्या भगवानाने काय विधाने केली होती.* जर तुम्ही इंग्रजी भाषेतील बायबल वाचू शकत असाल, तर अति उत्तम, बायबल अथवा कुराणचा हिंदीत अनुवाद करताना लोक मोठ्या चतुराईने शब्दांची निवड करतात. त्यामुळे तुम्ही धोका खाणे संभवनीय असते.

*ईसा मसीहाच्या बारा मुख्य शिष्यांपैकी एक शिष्य संत मॅत्थ्यूने ईसाची वाणी बायबलमध्ये अशाप्रकारे लिपिबद्ध केली -*

> 12:30 तो जो माझ्यासोबात नाही तो माझ्या विरुद्ध आहे.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

तात्पर्य हे की जो माझा अनुयायी नाही, तो माझ्या विरुद्ध जाणा.

> 10:34 विश्वात शांति-स्थापने साठी मी आलो असे समजू नका. मी आलो, शांतीसाठी नव्हे, तर तलवार घेऊन 10:35 कारण मी आलो अहे माणसास आपल्या पित्याविरुद्ध उभे करण्यासाठी, पुत्रीस मातेविरुद्ध, सुनेस सासूविरुद्ध 10:36 आणि माणसाचा शत्रू होईल त्याचा आपला परिवार.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

*संत ल्यूकने ही गोष्ट पुष्ट करीत ईसाची वाणी बायबलमध्ये अशी लिपिबद्ध केली -*

> 12:51 तुम्ही समजत असाल की मी या धरतीस शांतता चैन देण्यासाठी आलो, मी तुम्हांस सांगतो, नाही, मी आलो वाटण्या करण्यासाठी 12:52 कारण येथून पुढे घरात पाच पुत्र असतील, तीन दोघांविरूद्ध - दोघे असतील तीघांविरूद्ध 12:53 पिता असेल पुत्राविरूद्ध पुत्र असेल पित्याविरूद्ध - आई असेल पुत्रीविरूद्ध, पुत्री असेल मातेविरूद्ध - सासू असेल सूनेविरूद्ध सून असेल सासूविरूद्ध.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

*मग आत तुमच्या लक्षात आले का की या धरतीवर कलियुग आणणारा कोण होता?* चहेऱ्यावर पडदा एक आणि आतली विचारसरणी वेगळीच.

*आम्हां हिंदूंच्या परिवारांमध्ये फूट केव्हापासून पडली? तेव्हापासून जेव्हापासून भारतात आली ईसाई शिक्षण पद्धत. तिने आम्हांस काय शिकवले? जे काही 'हिंदू धर्मप्रेरित हिंदू जीवनमूल्ये' आम्हांला शिकवण देतात ते सर्व बडबड व कुचकामी आहे. सोडून द्या ते सर्व आणि बना आधुनिक. आमीरखानाच्या 'लगान' मध्ये महाराजे सांगतात की "हे इंग्रज तर आपल्या बापाचेही सख्खे असत नाहीत". खरे आहे यांनी आज आम्हांसही आपल्या बापाचे सख्खे ठेवले नाही असाच असतो परिणाम वाईट संगतीचा.*

*याच गोष्टीची पुन्हा पुष्टी करीत ईसाच्या बारा मुख्य शिष्यांपैकी एक शिष्य संत थॉमसने ईसाची वाणी गॉस्पेल ऑफ थॉमसमध्ये अशी लिपिबद्ध केली आहे.*

16 ईसाने म्हटले आहे की संभवत लोक असे समजत असतील की मी या जगात शांति - स्थापनेच्या हेतूने आलो असेन - ते जाणत नाहीत नाहीत की मी आलो आहे या धरतीवर फूट पाडण्यासाठी - आग, तलवार आणि युद्ध पसरविण्यासाठी - जेथे पाच असतील एका घरात - असतील तीन दोघांविरूद्ध - दोघे असतील तिघांविरूद्ध, पिता असेल पुत्राविरूद्ध, पुत्र असेल पित्याविरूद्ध आणि ते दोघे दृढ असतील कारण ते दोघे आपआपल्या ठायी एकाकी असतील.

ISBN 81-85990-21-2, p 76 n

टिप्पणी - जर तुम्ही पुस्तक क्रंमांक 04 तसेच 10 वाचाल तर त्यांत तुम्हांस शेकडो उदाहरणे मिळतील जी घेतली आहेत जीवनाच्या विभिन्न पैलूतून आणि विभिन्न देशकालाच्या संदर्भात. ही दोन्ही पुस्तके 568 पृष्ठांची आहेत. म्हणून बराच अवधी लागेल त्याचे हिंदी रूपांतर प्रस्तुत करण्यासाठी. त्यानतर त्यांचा मराठी अनुवाद होईल.

*संत ल्यूकने ही गोष्ट पुढे नेत ईसाची वाणी बायबलमध्ये अशी लिपिबद्ध केली -*

14:26 जर कोणी माणूस मजकडे येत असेल आणि जर तो आपल्या पित्याची घृणा करत नसेल - तसेच आईची, पत्नीची, संततीची, बहिण-भावाची, तसेच स्वतःच स्वतःची, तर तो माझा शिष्य बनू शकत नाही.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

*प्रथमपोपने ईसा मसिहाच्या शब्दांना आपल्या जीवनात खरे रूप दिले. जसे आपण बायबलच्या उपरोक्त उदाहरणांत पाहिले की ईसा म्हणतात (1) की असे समजू नका की मी आलो आहे या धरतीवर शांतीचा संदेश घेऊन - मी या धरतीवर शांती नव्हे तर युद्धाची तलवार घेऊन आलो आहे. ईसाने विचारले (2) तुम्ही असे समजता काय की मी आलो आहे या पृथ्वीवर शांती स्थापित करण्यासाठी. मी तुम्हांस सांगतो की - नाही (3) मी आलो आहे मानवांमानवात फूट पाडण्यासाठी. ईसा मसिहाने म्हटले की मी आलो आहे परिवांरात फूट पाडण्यासाठी पिता आणि पुत्र यांना एक दुस-याविरूद्ध उभे करण्यासाठी - आई आणि पुत्री यांना एक दुस-याविरूद्ध उभे करण्यासाठी - सासू आणि सून यांना परस्परांशी भांडण्यासाठी. एकाच परिवाराच्या सदस्यांना एक दुस-याचा शत्रू बनविण्यासाठी (4) ईसा मसिहाने म्हटले माझी अशी इच्छा की मुलांनी आपल्या आईबापाची घृणा करावी - मला वाटते की भावाबहिणींनी परस्परांची घृणा करावी.*

*पहिल्यापोपने या शब्दांचे अक्षरशः पालन केले. आणि 1835 मध्ये जेव्हा प्राचीन हिंदू शिक्षणपद्धत नष्ट करून ईसाई इंग्रजी शिक्षणपद्धतीची स्थापना केली गेली तेव्हापासून हळूहळू आम्हां हिंदूंनीही ईसा मसिहांच्या इच्छांचे पालन करणे शिकून घेतले. रामायण-महाभारतात तुम्हांस सासूं-सूनेचे भांडण दिसत नाही परंतु आज घराघरांत चर्चा आढळते.*

*ईसाई विधात्याची विधाने जी बायबलमध्ये लिपिबद्ध केली गेली आहेत डयूट्रॉनमी (विधि-विवरण) अंतर्गत बायबलच्या अनुयायांना असा निर्देश देतात की -*

13:6 जर तुमचा भाऊ तुमच्या स्वतःच्या आईचा मुलगा अथवा तुमचा पुत्र वा तुमची पुत्री अथवा तुमची पत्नी जी तुमच्या ह्रदयांत वसते वा तुमचा असा कोणी मित्र जो तुमच्या आत्म्यासमान आहे, यापैकी जर एखादयाने तुम्हांस फूस लावून म्हटले की चला आपण दुस-या धर्माच्या भगवानाची पूजा करू जो ना तुमचा देव आहे ना तुमच्या पूर्वजांचा 13:8 तुम्ही आपली सहमती देणार नाहीत. ना तुम्ही त्याचे म्हणणे ऐकाल ना

तुमच्या मनात त्याच्या प्रती दया असेल ना तुम्ही त्यास दया कराल ना तुम्ही त्याला लपवाल 13:9 तुम्ही त्यास खचितच मारून टाकणार. तुमचा पहिला हात असा असेल की तो त्याला मृत्यूच्या दारापर्यंत नेऊन पोहचवेल त्यानंतर इतर लोकांचे हात त्यावर पडतील 13:10 आणि तुम्ही त्यास दगडाने ठेचून माराल ज्यायोगे तो मरेल कारण त्याने तुम्हांस आपल्या भगवानापासून दूर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

त्याच बायबलचे अनुयायी छल-कपटाने तसेच विभिन्न उपायांनी हिंदूंनी आपल्या भगवानापासून दूर नेण्याच्या प्रयत्नात थकत नाहीत. विचारा त्यांच्याशी कसे वागावे? जर दारासिंहने मारले त्या व्यक्तीस जी हेच करत होती तर का दिली गेली त्यास मृत्यूची शिक्षा? *त्याने तर बायबलच्या एका अनुयायास चाखण्याची (अनुभवण्याची) संधी मात्र दिली होती.*

20:16 त्या शहरांना ज्यांचे तुम्हांस तुमच्या भगवानाने उत्तराधिकारी बनविले, त्या शहरांतील लोकांपैकी कोणासही श्वास घेत असलेले सोडू नका. 20:17 त्यांना पूर्णतया नष्ट करून टाका

32:24 त्यांना भुकेने तडफडू द्या. धगधगणा-या ज्वाळानी गिळून टाकू द्या. त्यांची शरीरे - त्यांचा मृत्यू अत्यंत दुखःद व्हावा. मी पाठवीन पशूनां, ज्यांचे दात त्यांच्या शरीरात खोलवर घुसतील आणि साप ज्यांचे विष त्यांना धुळीला मिळवतील. 32:25 तलवारीविना त्यांच्या ह्रदयात आतंक भरून टाका - तरण्या बांडाना, कुमारिकांना आईचे दूध पीत असणा-या बालकांना आणि वृद्धांना ज्यांचे केस पिकले आहेत.

पवित्र बायबल ISBN 0-8400-3625-4

*प्रथम पोपने ईसाई धर्माच्या भगवानाने बनविलेल्या विधानांचे मोठया आस्थेने पालन केले. रक्ताच्या नद्या त्याने वाहू दिल्या. थोडाही संकोच त्यांना वाटला नाही. आपण बायबलच्या उपरोक्त उदाहरणांत पाहिले की ईसाईधर्माच्या भगवानाचे विधान आहे (1) जर तुमची पत्नी, तुमचा पुत्र, तुमची पुत्री, तुमचा सख्खा भाऊ, तुमचा लंगोटियार जर तुम्हांस म्हणेल की चला आपण दुस-या धर्माच्या भगवानाची पूजा करू तर आवश्य त्यांस आपल्या हाताने मारून टाका (2) ती शहरे, ज्याच्यांवर तुम्ही कब्जा कराल त्यापैकी कोणासही जिवंत सोडू नका. त्यांना उपाशी मारा. त्यांना आगीत फेकून द्या. केवळ तरूणांनाच नव्हे तर कुमारिकांना आईचे स्तनपान करणा-या लहान-लहान मुलांना, तसेच पांढरे केस असणा-या वृद्धांना. कोणासही श्वास घेत असलेले सोडू नका.*

*जे ईसाई बनू इच्छित नसत त्यांना ईसाई धर्माधिकारी दंड देत. कशाप्रकाराचे दंड देत त्याचे विवरण ऐका. ऑक्सफोर्ड शब्दकोषानुसार पोप ग्रेगरी नववे यांनी 'धर्मन्यायाधिकाराची' स्थापना केली सन 1232 च्या सुमारास.*

*'द एम्पायर ऑफ द सोल'* मध्ये पॉल विलियम रॉबर्टस लिहितात (1) आईबापाच्या डोळयादेखत बालकांवर कोरडे ओढले जात आणि मग त्यांच्या शरीराचे तुकडे केले जात. आईबापाच्या पापण्या छाटून टाकल्या जात त्यामुळे त्यांना डोळे बंद करणे शक्य होत नसे. बालके तडफडत आहेत. ईसाई न बनण्याच्या दंडाच्या रूपात आईबाप बीभत्स दृश्य आपल्या उघडया डोळयांनी पाहण्यास बाध्य केले जात. पुष्कळ सावधपणे आईबापाचे हातपाय छाटले जात व पापण्याही छाटल्या गेलेल्या असत. (2) पुरूषांची जननेंद्रिय छाटली जात आणि त्यांच्या पत्नीसमक्ष ती जाळून टाकली जात. स्त्रियांची

स्तने छाटली जात आणि त्यांच्या योनीत तलवार खुपसली जात. त्यांच्ये पती असले घृणित कार्य पाहत राहण्यास बाध्य केले जात. आणि, असे चालत राहिले दोनशे वर्ष.

Hindu Voice, Nov 2003, The Saint Buisness, Rajeev Srinivasan, quoting from "The Empire of the Soul" Harper Collins, 1999, pp 4-5

*असे समजू नका की या सर्व फार जुन्या गोष्टी असतील. हे बीभत्स कांड चालत राहिले सन 1560 ते 1812 पर्यंत गोव्यात आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रात. एकदा विचार करून पहा त्यांच्या जागी तुम्ही असता तर. कोण जाणे मागच्या जन्मी तुम्ही त्यांच्यापैकीच एक असाल. आणि अशा बीभत्स यातना तुम्ही सुद्धा भोगल्या असतील. हे नराधम ईसाई आज मोठमोठया बाता ठोकतात आणि आम्हां हिंदूंना मानवतेचे पाठ पढवितात. हयूमन राईटसच्या गप्पा मारतात. नरभक्षक हिंस्र पशूही लज्जित होतील या ईसायांच्या कुकर्माच्या गाथा ऐकून.*

*ईसायांचे एक महान संत होऊन गेले. त्यांचे मोठे नाव होऊन गेले. मुंबईत तर त्यांच्या सन्मानार्थ अगणित शाळा व महाविदयालये आहेत, ज्यायोगे तेथे शिकणा-या हिंदू युवकांना माहीत व्हावे की ते किती महान होते. एका अत्यंत धार्मिक प्रवृत्तीच्या डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये त्या संताचा फोटो भगवान श्री कृष्णाच्या फोटोच्या बाजूला ठेवल्याचे दिसले. ज्याची दररोज पूजा केली जात असे. त्या संताचे नाव आहे फ्रान्सिस जेवियर. त्यांनी सर्वप्रथम शिफारस केली होती की धर्म न्यायधिकरणाची स्थापना व्हावी. त्यांच्या अशा शिफारशीचा परिणाम हिंदू बालके, स्त्रिया, पूरूष दोनशे वर्षे सोशीत राहिले. आणि आज आपण त्याना किती मान देतो. याला तुम्ही आपला मोठेपणा समजता काय? असा मूर्खपणा कधीही करू नका. किमान आपले भगवान श्री कृष्ण तर असली शिक्षा, असले शिक्षण कधी देत नाहीत.*

*हे ईसाई तसेच ईसाई शिक्षण पद्धतीत प्रशिक्षित झालेले हिंदू आज हिंदू धर्म तसेच हिंदू जीवनमूल्ये यांची आलोचना, निंदा करताना थकत नाहीत. अशांच्या दृष्टीतून हिंदू धर्म तसेच हिंदू जीवनमूल्यांची पारख करण्याने तुम्ही काय शिकाल?*

## ईसाई धर्मातील द्वितीय वैशिष्ट्य - कामातुर प्रवृत्ती

ईसाई धर्माचे हे एक महान पोप होते. भारतवर्षाच्या सागरी मार्गाच्या शोधात यांचे महत्तवपूर्ण योगदान होते, ज्यांची चर्चा तेव्हा करू जेव्हा सत्तेप्रत असीमित लालसेच्या इतिहासाचा तुम्हांस परिचय करवू. हे होते पंधराव्या शताब्दीचे पोप अलेक्झांडर सहावे. यांच्या चरित्राच्या काही विशेष बाबींचा तुम्हांस परिचय करून देऊ -

(1) या पोपने आपल्या पुत्रीशी लैंगिक संबंध ठेवले (2) आपल्या पुत्रासह हे वेश्यांकडे जात असत (3) धनाच्या लोभाने यांनी आपल्या कार्डिनलांवर विषप्रयोग केला. यांचा अंतही विष दिलेगेल्यामुळे झाला, अगदी, तसाच जसा यांनी कार्डिनलला विष देऊन मारले (4) चर्चाच्या विशेषाधिंकारांची खरेदी विक्री यांनी केली (5) यांच्या महालात उच्छृंखल पाटर्या झडत असत. ज्यात अनियंत्रित रूपाने मद्य वाहत असे आणि मद्यधुंद यौनाचार होत असे.

Joseph McCabe in The Testament of Christian Civilization, as quoted in ISBN 81-85990-21-2 p 79n

आपले आदरणीय ईसाई धर्माचे धर्मगुरू आपल्या पुत्रीशी यौनाचार करत असत. आज ईसाई देशांकडून आपल्याकडे किती चांगल्या-चांगल्या गोष्टी येत आहेत. उदाहरणार्थ इंटरनेटवर पोनोग्राफीचा भडिमार ज्यात श्वेतवर्णीय स्त्री-पुरूषांना यौनाचार करीत असलेले एका सिनेमाप्रमाणे दाखविले जाते. आता तर इंटरनेटवर जाण्यासाठी संगणकाचीही आवश्यकता नाही. आपल्या मुलाबाळांच्या हातात जो मोबाईल असतो त्यातच सर्वकाही पाहावयास मिळते, शेवटी आपल्या पोराबाळांनाही ईसाई-इंग्रजी शिक्षण पद्धतीने शिकून सवरून मोठा माणूस बनणे आहे. आणि मग पुढे चालून ईसाई धर्मगुरूंच्या पावलावर पाऊल ठेवून चालवण्यालायकही बनवायचे आहे ना?

*आपले हेच पूजनीय पोप आपल्या तरूण पुत्रासह वेश्यालयांमध्येही जात असतं. ते असे का करीत असत? शेवटी ईसाई संस्कृती आपणांस शिकविते की जेव्हा पुत्र मोठा होईल तेव्हा त्यास आपल्या बरोबरीचा दर्जा दिला पाहिजे आणि त्यास आपल्या मित्रासमान समजले पाहिजे म्हणून त्यांच्या संस्कृतिनुसार पुत्र पित्याप्रमाणे सिगारेट आणि मद्य तर पीतच असतो तसेच वेश्यालयांमध्ये जाण्याचा आधिकारीही बनतो. आपण हिंदूंनी बरेच काही हया ईसायांकडून शिकून घेतले आहे. आणि जे काही शिकावयाचे राहिले आहे तेही हया शिक्षणाच्या सातव्या पिढीच्या शेवटपर्यंत शिकूनही घेऊ. आपण आपली त्वचा जणू रंगवून त्यांच्यासारखी पांढरी करू शकलो नाही तरी त्यांचे आचार विचार आणि त्यांची जीवनमूल्ये आपलीशी करून स्वतःस त्यांच्या ऐवढे नसले तरी थोडे का होईना समकक्ष बनविण्याचा गौरव-बोध तरी करू शकतो ना?*

*ईसायांचे चरित्र ऐवढे गचाळ का असते आणि आपण हिंदूही त्यांच्या संगतीत राहून त्यांच्यासारख्याच गचाळ चरित्राचे का बनतो व बनत आहोत यावर विचार आपणच करावयाचा आहे. हां तुम्हांस असा विचार करण्यापासून रोखण्यासाठी, परावृत्त करण्यासाठी अनेक कल्पित कहाण्यांना हिंदू इतिहासाचे अंग बनवले जात आहे. ज्यायोगे तुम्ही अशाच विचारात गढून जावे की जर आपले चरित्र ऐवढे गचाळ असेल तर आपण इतरांकड बोट कसे उचलू शकतो. यांच युक्तीने तुमच्या मोठमोठया दिग्गजांना मूर्ख बनवीत राहिले आणि हे दिग्गज आपला मूर्खपणा जनसामान्यांना वाटत बसले .*

> आपण हिंदू लोक (ईसाई-इंग्रजाहून) कितीतरी श्रेष्ठ आहोत. दोन विषयांत - (1) विलास प्रियता, लांपटय, व्याभिचारापासून मुक्त तसेच (2) आचरणातील पावित्र्य

Elphinstone's History of India, e.d. Cowell pp 375-381, quoted in ISBN 0-14-100437-1

*परंतु ही गोष्ट आपणांस सांगितली गेली नाही. का कारण आपल्या चांगल्या गोष्टींबद्दल अनभिज्ञ राहावे ज्यामुळे आपणच आपल्यास दोषी मानीत राहिलो आणि आपला जातीय स्वाभिमान इतका खाली यावा की आपण डोके उंचावण्यायोग्य न रहावे.*

*असो. आता विषय बदलू. आपली भेट करवू काही इतर पोपांशी. त्यानंतर तुम्ही विचार करा की कशा असाधारण चरित्राचे धनी असत ईसाई धर्माचे हे सर्वच सर्वोच्च धर्मगुरू, तसेच या सर्वांनी आपल्या अनुयायांना किती सुंदर चरित्राचे धनी बनविले असेल?*

> महासभेत सदोतीस साक्षीदार ज्यात अधिकांश धर्माध्याक्ष तसेच पुरोहित होते - त्यांच्या साक्षीवरून असे प्रमाणित झाले की पोप जॉन तेरावे व्याभिचारी, परस्त्रीगामी, कौटुंबिक व्याभिचार, लौंडबाजी करणारे, चो-या तसेच खून करणारे होते. याव्यतिरिक्त प्रत्यक्षदर्शियांच्या

साक्षीनुसार शीलभंग आणि बलात्कार केले होते तीनशे जणांवर (मठनिवासी धर्म-संघिनींवर). यांचे नाव होते पोप जॉन 13वे.

Dwight Roman Republic in 1849 p115 quoted in ISBN 81-85990-46-8 p97 fn97

*याच असाधारण चरित्रांची बिंबे आपण पाहतो आज अमेरिकेच्या जनजीवनात. याला आधुनिकतेचा प्रभाव समजण्याची भूल न करावी. तेथील 84 टक्के जनता ईसाई आहे. तेथे 98 टक्के सैनिक ईसाई आहेत.*

ईसाई धर्माच्या या सर्वोच्च धर्मगुरूंचे कारनामे ऐकून तुम्ही थक्क व्हाल. यांचे पौरूष असाधारण असे. "आमचे धर्मगुरू नपुंसक नाहीत". या गोष्टीची अनुभूती रोमच्या जनतेस वेळोवेळी करत राहणे त्यांना आवश्यक वाटत असे.

ते इतकी अनौरस बालके जन्मास घालत की त्यांच्या पालनपोषणासाठी त्यांना प्रकांड मठाची व्यवस्था करावी लागली होती. जन्मपत्रिकेत पोपचे नाव पित्याच्या रूपात नोंदवले जात असे. जेव्हा रोममध्ये महान शोभयात्रा निघत असे तेव्हा पोपची ही अनौरस बालके त्यांच्या पुढेपुढे चालत असत.

Familiar Discourses, 383 quoted in ISBN 81-85990-46-8, p 97, fn 97

सहा हजार नवजात शिशूंची शिरे आढळली त्या मत्स्य तलावात जो त्या कॉनवेण्ट शेजारी होता जो "ईसा मसिहाच्या नववधू" चे निवासस्थान होते.

Ibid quoted in ISBN 81-85990-46-8, p 97, fn 97 and p XX

तेराव्या शताब्दीच्या इंग्लंडमध्ये हेनरी तिसरे, जे लीगचे पादरी होते, त्यांना 65 अवैध संतती होती. यावरून हिशोब करा, की त्यांनी किती कठोर परिश्रम केले असतील आणि किती स्त्रिया बरबाद केल्या असतील.

याच पादरी महाशयांनी एकदा जनसमुदायासमोर एका महाभोजनप्रसंगी आपली फुशारकी सांगताना जाहीर केले की 22 महिन्यांत 14 बालकांनी जन्म घेतला होता.

Lecky - Hist. European Morals, p 350, Ibid, Vol. 2, p 349, quoted in ISBN 81-85990-46-8, p 97, fn 97

या गोष्टीची उघडपणे पुष्टी केली जात होती की इंग्लंडमध्ये पाद-यांनी एक लाख स्त्रियांना लंपट दुराचारिणी बनविले होते.

Draper - Intellactual Developement of Europe, p. 498 quoted in ISBN 81- 85990-46-8, p 97, fn 97

## नाटकातील पात्रे बदलणे - हीच त्यांची चाल होती

एक विशेष योग्यता आढळेल, या ईसाई इतिहासकारांत, ईसाई शिक्षणाने प्रभावित लेखकांत, तसेच इतिवृत्त लेखकांत, तुम्हांस केवळ इतिहासात डोकावे लागेल. तसेच ताज्या घडामोडींवर विशेष लक्ष ठेवीत रहावे लागेल. आणि तुमच्या समोर उदाहरणे शेकडयांनी आढळतील.

*ही मंडळी नाटकांची पात्रे बदलण्यात मोठी हुशार आहेत. भूतकाळातल्या ब्राह्मण समुदायासंबंधी अनेक घटना तुम्हांस आढळतील. यांच्या कहाण्यात तुम्हांस अशाच घटनांची चुणूक आढळेल, ज्या ईसाई पादरी लोक स्वःतच घडवत आले आहे. त्यांना केवळ एवढेच करावे लागले की त्यांनी आपला इतिहास पहावा आणि त्याच्याच धाटणीत हिंदू इतिहासाचे पुनर्लेखन करावे.*

*असा इतिहास जेव्हा नवयुवक-युवतींनी आपल्या पाठय पुस्तकात पाहिला अथवा ऐतिहासिक उपन्यासांत, कादंब-यात, नाटकांत वाचला तेव्हा तोच खरा मानू लागले. कारण मागच्या सहा आंग्ल शिक्षण प्रणालीत अशा साहित्याचा भडिमार झाला. आम्ही त्यांच्या नजरेतून आपल्या पूर्वजांना पाहणे व ओळखणे शिकलो.*

*आजच्या प्रसारमाध्यमांनी या कलेत विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. तुम्ही जर कांची शंकराचार्याच्या अटकेनंतर इंग्रजी प्रसारमाध्यमांद्वारे प्रकाशित समाचार पाहाल तर तुम्हांस बरेच काही मिळतेजुळते पाहण्यास मिळेल. उदाहरणार्थ, शंकराचांर्यानी एका व्यक्तीची हत्या करविली (निरनिराळे पोप वेळोवेळी असेच करीत असत). दुसरे उदाहरण, शंकराचार्यांनी मठात येणा-या महिलांशी लैंगिक संबंध ठेवले (अनेक पोपनी यात मोठी योग्यता प्राप्त केली होती). असे सर्व काही करण्याची आवश्यकता शंकराचार्याना भासली नसेल. पण ईसाई शिक्षणाने व संस्कृतीने प्रभावित इंग्रजी प्रसार माध्यमांच्या दिग्गजांना या गोष्टीची विशेष आवश्यकता भासली होती की त्यांनी आपल्या मेंदूस विशेष ताण द्यावा आणि काही नवे शोधून काढावे. आधिक दूर जाण्याची त्यांना गरज भासली नाही. ईसाई धर्मगुरूंच्या चरित्राच्या आधारावरच हिंदू धर्मगुरूंचे चित्र त्यांनी रेखाटले.*

बॉस्टन अमेरिका सन 2003 चे एक वृत्त -

> मैसाचुसेंटसच्या ॲटर्नी जनरलने म्हटले की किमान 789 व्यक्तींनी सुमारे 250 पाद-यांविरूद्ध आरोप नोंदविलेले आहेत. ते जेव्हा लहान होते आणि गिरजाघरी जात असत तेव्हा या पाद-यांनी त्यांना यौनसंबंधासाठी बाध्य केले होते. ॲटर्नी जनरलने असेही म्हटले आहे की अन्य स्त्रोताकडून माहिती काढल्यावर ही संख्या हजारावर जाईल. या खुलाशानंतर जगभरातून निरनिराळया भागातून लोक आपल्या बालपणात पाद-याविरूद्ध यौनसंबंधासाठी बाध्य करण्यात आल्याच्या घटना उघड करू लागले.

The Free Press Journal, Mumbai edition, 25 July 2003, p 7 World

वॉशिंग्टन येथील सन 2005 चे वृत्त -

> पाद-यांच्या दुस-या वार्षिक इतिवृत्तानुसार पाद-यांविरूद्ध 1092 नवे आरोप आले आहेत.

पाद-यांचा हा शौक चर्चला फार महागात पडला -

> डॉ. मॅक्चेसननुसार सन 1950 पासून आजपर्यंत 800 मिलीयन डॉलर्स (1 डॉलर 43 रूपये हया हिशोबाने 34 अब्ज 40 कोटी रूपये) द्यावे लागले. केवळ मागच्या वर्षाचा भुर्दंड होता 139.6 मिलीयन 6 अब्ज रूपायांची क्षतिपूर्ती.

धर्मगुरू पदाचा अनुचित लाभ घेत ते अशी सर्व दुष्कृत्ये करतात -

> वर उल्लेखलेले 1092 नवे आरोप 1083 व्यक्तींद्वारे करण्यात आले. त्यापैकी अधिकांश आरोप पुरूषांनी केले. 1950 पासून 2002 पर्यंत 10667 बालकांना बाध्य पाद-यांनी त्यांच्याशी यौनसंबंध प्रस्थापित केले होते. डॉ. मॅक्चेसननुसार वास्तविक संख्या आपणांस कधीही कळू शकणार नाही. कारण अनेक व्यक्ती अशा सर्वासमोर उघउ करू शकत नाहीत.

The Times of India, Mumbai Edition, 20 February 2005, p 10

## आता तुलना करा या सर्वांची, आपल्या पुरातन हिंदू समाजाशी

फार जुन्यातली गोष्ट नाही. साधारणपणे दोनशे वर्षेही लोटली नसतील. मुंबईचे एक गर्व्हनर होते. एल्फिन्स्टन, ज्यांच्या नावावर एक महाविद्यालय आणि एक रेल्वे स्टेशन मुंबईत आहे. त्यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की -

हिंदू आम्हा ईसाई इंग्रजाहून कितीतरी अधिक श्रेष्ठ आहेत दोन विषयांत-

(1) विलासिता लंपटपणा व व्याभिचारापासून मुक्तीत तसेच
(2) आचरणात पावित्र्य

Elphinstone's History of India, e.d. Cowell pp 375-381, quoted in ISBN 0-14-100437-1

काहीसे असेच एका पंचवीस वर्षीय केनेडियन सहका-याने मला सन 2000 मध्ये म्हटले होते - आम्हां सर्वाहूंन तुम्ही कितीतरी अधिक पवित्र आहात. माझ्यात त्याने काय पाहिले होते. कोणास ठाऊक? बहुधा त्याचा संकेत आचरण व चरित्रावर होता कारण त्याने पवित्र शब्द (pure) प्रयुक्त केला होता.

*जो पर्यंत आम्ही स्वतःस या आसुरी प्रवृत्तीच्या लोकांपासून दूर ठेवले होते, तोपर्यंत आमचे पवित्र आम्हांपासून दूर होत गेले नव्हते. सहा पिढयांच्या संगतीनंतर आज आम्ही त्यांच्या इतके निकट आलो आहोत की आम्ही आमचे पावित्र्य पूर्णतया गमावून बसलो. म्हणूनच आमची वृद्ध मंडळी म्हणतात की वाईट संगतीचा परिणाम वाईटच. आज आम्ही तर ऐवढे मिसळून गेलो आहोत त्यांच्याशी की त्यांचे आचरणच आम्हांस उचित तर आमचे पुरातन आचरण आम्ही कुचकामी व त्याज्य समजू लागलो आहोत.*

## या ईसाई-इंग्रजी शिक्षणाने, आम्हांस कशाचे काय करून टाकले?

*आपण जे काही वाचतो आणि जे काही चोहीकडे पाहतो, ते सर्वच आपल्या मनावर व मेंदूवर काही ना काही ठसा उमटवून जाते.*

*शिक्षण, मग ते कशाप्रकारचे का असेना, आपल्या विचारांना आणि भावनांना दिशा देत असते. आपले विचार आणि आपल्या भावना आपले आचार घडवत असतात. जेव्हा हिंदू शिक्षणपद्धत आपल्या शिक्षणाचे माध्यम होती तेव्हा तिने आपले चारित्र्य एका विशिष्ट साच्यात ढाळले होते. जेव्हा आसुरी शिक्षणपद्धत आपल्यावर 1835 पासून लादण्यात आली, तेव्हा तिने आपणांस हळूहळू आसुरी बनवले. आजचा हिंदू कालचा हिंदू राहिला नाही ज्याचे आचरण पवित्र असे.*

*हे पादरी आणि पोप आपापल्या घरी काय करतात याच्याशी आम्हांला काही देणेघेणे नाही. परंतु त्यांनी आमच्या घरात जबरीने घुसून आम्हांस व आमच्या मुलाबाळांना आपल्यासारखे अमंगल करणे सुरू केले म्हणून आपण हे जाणून घेणे आवश्यक ठरते की त्यांच्याविना आम्ही कसे होतो व त्यांच्या संगतीने आम्ही कसे बनलो.*